<table>
<tr><td rowspan="5">MHKO110017092025</td><td>प्रकरण दाखल दिनांक</td><td>:</td><td colspan="3">१६/०९/२०२५</td></tr>
<tr><td>प्रकरण नोंदणी दिनांक</td><td>:</td><td colspan="3">१६/०९/२०२५</td></tr>
<tr><td>निकाल दिनांक</td><td>:</td><td colspan="3">१६/०३/२०२६</td></tr>
<tr><td>कालावधी</td><td>:</td><td>व.</td><td>म.</td><td>दि.</td></tr>
<tr><td colspan="2"></td><td>००</td><td>०६</td><td>००</td></tr>
</table>

**<u>पेठ–वडगांव येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय, ता. हातकणंगले,</u>**
**<u>जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात</u>**
**(पिठासीन अधिकारी जे.एन. भस्मे )**
**न्यायनिर्णय घोषीत दिनांक – १६ मार्च, २०२६**

**(नियमित फौजदारी खटला क्र. २११/२०२५)**
**(निशाणी क्र. ५५ )**

**गुन्हा नोंद क्र. ११९/२०२५,**
**हातकणंगले पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर.**

| | | |
|---|---|---|
| **अभियोगपक्ष** | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>हातकणंगले पोलीस ठाणे, जिल्हा – कोल्हापूर. |
| अभियोग पक्षातर्फे | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>श्रीमती आर.एच. मोरे. |
| **आरोपी** | १. | **टिपुसुलतान नबीसाब उर्फ आयुब खतीब,**<br>वय वर्ष –३१, व्यवसाय – हॉटेल,<br>रा. संजयनगर माळभाग, हेर्ले,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. |
| | २. | **मोहम्म्द शब्बन कुरेशी,**<br>वय वर्ष –३२, व्यवसाय – वेटर काम,<br>मुळ रा. चंदुरी, जि. बरेली, राज्य– उत्तरप्रदेश<br>सध्या रा. बाबज हॉटेल, हेर्ले,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |

| | | |
|---|---|---|
| | ३. | **प्रविण नथ्था पाटील,**<br>वय वर्ष ५४, व्यवसाय – पान टपरी,<br>मुळ रा. चिखली, ता. हवेली, जि. पुणे<br>सध्या रा. बाबज हॉटेल, हेर्ले,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| | ४. | **मनोज संजय कांदे,**<br>वय वर्ष –२९,<br>मुळ रा. धायरी, ता. हवेली, जि. पुणे<br>सध्या रा. बाबज हॉटेल, हेर्ले,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | | श्री. एस. एस. डफळे |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | १७/०३/२०२५ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | १७/०३/२०२५ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | १६/०९/२०२५ |
| गुन्ह्याचे घटक निश्चित केल्याचा दिनांक | :– | २७/१०/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | २१/०२/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | --- |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | १६/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात. | :– | --- |

## आरोपीची माहिती

| अ. क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | टिपुसुलतान नबीसाब उर्फ | १८/०३/२०२५ | १८/०३/२०२५ | भारतीय न्याय संहिता | निर्दोष मुक्तता | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | आयुब खतीब | | | कलम ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) व भारतीय हत्यार कायदा कलम ३० | | | |
| २ | मोहम्म्द शब्बन कुरेशी | १८/०३/ २०२५ | १८/०३/ २०२५ | | निर्दोष मुक्तता | -- | -- |
| ३ | प्रविण नथ्था पाटील | १८/०३/ २०२५ | १८/०३/ २०२५ | | निर्दोष मुक्तता | -- | -- |
| ४ | मनोज संजय कांदे | १९/०३/ २०२५ | १९/०३/ २०२५ | | निर्दोष मुक्तता | -- | -- |

**अ. अभियोग पक्षातर्फे घेतलेले साक्षीदार :**

| **अ.क्र.** | **साक्षीदाराचे नांव** | **निशाणी** | **साक्षीदाराचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| **अ.सा.क्र.१.** | अभिषेक छत्री बोगाटी | **४३** | फिर्यादी |
| **अ.सा.क्र.२.** | जीतूकुमार | **४८** | साक्षीदार |

**ब. अभियोगपक्षातर्फे निशाणी दिलेले दस्तऐवज :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| **१.** | ४४ | फिर्यादवरील सहीस |

**बचावपक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदारांची यादी.**

| **अ.क्र.** | **साक्षीदाराचे नांव** | **स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| **१.** | निरंक | निरंक | निरंक |

**बचावपक्षातर्फे दिलेले दस्तऐवज**

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| **१.** | निरंक | निरंक |

**न्यायालयामार्फत तपासणेत आलेल्या साक्षीदारांची यादी.**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | निरंक | निरंक | निरंक |

**न्यायालयामार्फत दिलेले निशाणी**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३२ | दोषारोप |
| २. | ३३ ते ३७ | आरोपींचे निवेदन |

**मुद्देमालाचे विवरण**

| मालमत्तेचे वर्णन | निशाण क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| एक लोखंडी रॉड<br>(सविस्तर वर्णन दोषारोपपत्राप्रमाणे) | .. | .. |
| एक लाकडी बांबूची काठी<br>(सविस्तर वर्णन दोषारोपपत्राप्रमाणे) | .. | .. |
| एक भारतीय बनावटीची पिस्टल<br>(सविस्तर वर्णन दोषारोपपत्राप्रमाणे) | .. | .. |
| दोन पेनड्राईव्ह<br>(सविस्तर वर्णन दोषारोपपत्राप्रमाणे) | .. | .. |

## न्या य नि र्ण य
## ( घोषित दिनांक १६/०३/२०२६ )

प्रस्तुत खटला आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) व भारतीय हत्यार कायदा कलम ३० या अपराधाकरीता संपरिक्षा घेण्यात येते.

**अभियोगपक्षाची थोडक्यात हकिकत खालील प्रमाणे–**

**०२.** दि. १७/०३/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजणेचे सुमारास फिर्यादी व जितुकुमार हे चिकन आणण्याकरिता माले फाट्याजवळील हॉटेल बाबा येथे गेले असता सदर हॉटेलचे मालक व स्टाफनी फिर्यादी व जितुकुमार यांना लाकडी काठीने व

लोखंडी रॉडने मारहाण करुन जखमी केले. तसेच हॉटेल बाबाचे मालक आरोपी क्र.१ यांनी फिर्यादीचे डोक्यास पिस्तुल लावून दारु पाजली व त्यांचा व्हीडोओ काढला. तसेच मला व जितुला चाच्याने पाठवले आहे जबरदस्तीने बोलण्यास सांगितले. तसेच तु आणि तुझी बायको उद्याच्या उद्या निघुन जा नाहीत तुझ्या बायकोवर सगळ्यांना रेप करायला लावीन असे म्हणून मारहाण व शिवीगाळ केली. त्यावरून फिर्यादी यांनी पोलीस ठाणे येथे आरोपींविरुद्ध फिर्याद दिली.

**०३.** फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन हातकणंगले पोलीस ठाणेच्या पोलिसांनी गुन्हा रजिस्टर्ड नं.११९/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) व भारतीय हत्यार कायदा कलम ३० अन्वये गुन्हा नोंदविला.

**०४.** तपासीक अंमलदार श्री. एस. एस. मेमाणे यांनी तपास केला, घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जाबजवाब नोंदविले, मुद्देमाल जमा करुन पावती प्राप्त केली व तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) व भारतीय हत्यार कायदा कलम ३० अन्वये शिक्षापात्र गुन्हयाबाबत दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले.

**०५.** आरोपींवर नि.क्र.३२ प्रमाणे दोषारोप निश्चित केले. आरोपींनी गुन्हा नाकबुल करुन संपरिक्षेची मागणी केल्या वरुन त्याच्या विरुध्द खटला चालविण्यात आला. अभियोग पक्षाच्या एकंदरीत पुराव्यातून गुन्हादर्शक परिस्थिती निष्पन्न न झाल्याने आरोपींचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१(१)(ब) अन्वयेचे निवेदन नोंदविण्यात आलेले नाही.

**०६.** सदर कामी सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींचे वकील यांचा युक्तिवाद ऐकला. एकंदरीत खालील विचारार्थ बाबी माझे समोर निर्माण होतात त्यावरील माझे निष्कर्ष प्रस्तुत कारणमिमांसेच्या आधारे मी पुढील प्रमाणे नोंदवित आहे-

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दि. १७/०३/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजणेचे सुमारास आरोपी क्र. १ ते ४ यांनी समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ माले गावचे हद्दीत असलेले हॉटेल बाबा येथे लाकडी काठी व लोखंडी रॉडने या धोकादायक शस्त्रांचा वापर करुन फिर्यादी व जितुकुमार यांना स्वेच्छेने गंभीर दुखापत केली आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय न्याय संहिता कलम ११८(२), ११८(१) सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला ? | **नाही..** |
| २. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपी क्र. १ ते ४ यांनी समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ फिर्यादी व जितुकुमार यांना जाणुनबुजून स्वेच्छेने दुखापत केली आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय न्याय संहिता कलम ११५(२) सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला ? | **नाही..** |
| ३. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, उपरोक्त दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपी क्र.१ ते ४ यांनी समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ फिर्यादी व जितुकूमार यांचा उद्देशपूर्वक अपमान करुन प्रक्षोभित केले व त्यायोगे त्याचेकडुन शांतता भंग होईल किंवा अपराध घडेल असा आरोपींचा उद्देश होता आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय न्याय संहिता कलम ३५२ सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला ? | **नाही..** |
| ४. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, उपरोक्त दिनांक, वेळ व ठिकाणी, आरोपी क्र.१ ते ४ यांनी समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ फिर्यादीला धमकी देवुन धाकधपटशा केली आणि | |

त्याद्वारे आरोपींनी भारतीय न्याय संहिता कलम ३५१(२) सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला ? **नाही..**

५. अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, उपरोक्त दिनांक, वेळ व ठिकाणी, आरोपी क्र. १ ते ४ यांनी समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ फिर्यादीला धमकी देवुन धाकधपटशा केली आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय न्याय संहिता कलम ३५१(२) सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला ? **नाही..**

६. अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, उपरोक्त दिनांक, वेळ व ठिकाणी, आरोपी क्र. १ ते ४ यांनी समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ कोणत्याही शासकीय परवान्याशिवाय पिस्तुल हे हत्यार वापरुन भारतीय हत्यार कायद्यातील तरतुदींचा भंग करुन गुन्हा केल्याचे निदर्शनास आले आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय न्याय संहिता कलम ३० अन्वये गुन्हा केला ? **नाही..**

७. आदेश काय ? **आरोपींची निर्दोष मुक्तता करणेत येते.**

## :: कारणमिमांसा ::

**वादप्रश्न क्र.१ ते ६ करीता -**

**०७.** सदरच्या वादप्रश्नांचे निष्कर्ष एकमेकांवर अवलंबुन असल्यामुळे, विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर वादप्रश्नांचे विवेचन एकत्रीतरित्या करण्यांत येत आहे. प्रकरणात समोर आलेल्या अभियोग पक्षाचा पुरावा पहाता, विचारार्थ वादप्रश्न क्रं.१ ते ६ स्वतंत्रपणे चर्चेस घेण्याची मुळीच आवश्यकता नाही. त्यामुळे मी बाब क्रं.१ ते ६ एकत्रीतपणे विचारात घेत आहे. संचिकेतील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले.

**०८.** साक्षीदार क्र. १ अभिषेक छत्री बोगाटी व साक्षीदार क्र. २ जीतुकुमार यांनी त्यांचे पुराव्यात कथन केले की, दि. १७/०३/२०२५ रोजी काय घटना घडली हे

त्यांना माहिती नाही. आरोपींनी त्यांना हॉटेल बाबा येथे मारहाण व शिवीगाळ केल्याबाबतची कथने त्यांनी नाकारली. पोलीसांसमोरील त्यांच्या जबाबामधील मजकूर त्यांनी नाकारला. सदर साक्षीदार क्र. १ व २ यांनी अभियोगपक्षास अनुकुल अशी साक्ष दिलेली नाही, म्हणून अभियोगपक्षाने सदर साक्षीदार यांस उलटतपासात ग्राहय असणारे सुचक प्रश्न विचारले असता त्यातूनही अभियोगपक्षास अनुकुल ठरेल असे काहीही निष्पन्न झाले नाही. सदर साक्षीदार हे फिर्यादी व जखमी असुन देखील त्यांनी अभियोगपक्षाच्या बाजुने साक्ष दिलेली नसल्यामुळे आरोपींविरुध्द कोणताही पुरावा आलेला नाही. फिर्यादी व जखमी यांनी सरकार पक्षास मदत होईल अशी साक्ष दिली नसल्यामुळे इतर साक्षीदार तपासुन देखील आरोपींविरुध्द पुरावा येईल याबाबत शंका असल्यामुळे अभियोगपक्षाने इतर साक्षीदारांना तपासले नाही.

**०९.** फिर्यादी व जखमी यांच्या माध्यमातून अभिलेखावर आणलेला पुरावा हा आरोपींनी त्यांचेवर दोषारोपीत केलेला गुन्हा केला आहे हे सिध्द होण्यास पुरेसा नाही. आरोपींनी गुन्हा केला असल्याबाबत भक्कम व सबळ पुरावा देण्याची जबाबदारी अभियोग पक्षावर आहे. उपलब्ध पुरावा आरोपींनी गुन्हा केला आहे असे मानण्यास पुरेसा नाही व त्याचा फायदा निश्चितच आरोपींच्या पक्षात जातो. त्यामुळे मी वादप्रश्न क्र.१ ते ६ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>वादप्रश्न क्र. ७ करीता-</u>**

**१०.** उपरोक्त विवेचनावरुन व निष्कर्षावरुन आरोपींनी भारतीय न्याय संहिता कलम ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) व भारतीय हत्यार कायदा कलम ३० अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने संशयापलीकडे सिध्द न केल्यामुळे आरोपींना मी निर्दोष मुक्त ठरवत आहे. यास्तव मी वादप्रश्न क्र. ७ करीता पुढील आदेश पारित करीत आहे-

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र. १ टिपुसुलतान नबीसाब उर्फ आयुब खतीब, २. मोहम्म्द शब्बन कुरेशी, ३. प्रविण नथ्था पाटील व ४. मनोज संजय कांदे यांना भारतीय न्याय

संहिता कलम ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) व भारतीय हत्यार कायदा कलम ३० अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्हयातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) नुसार निर्दोष सोडण्यात येते.

२. आरोपींचे जामीन कदबे रद्द करण्यात येत आहेत.

३. जप्त मुद्देमाल भारतीय बनावटीची एक पिस्तुल(सविस्तर वर्णन दोषारोपपत्रप्रमाणे) पुढील कार्यवाहीसाठी अपील कालावधीनंतर जिल्हा दंडाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे पाठविणेत यावी.

४. जप्त मुद्देमाल दोन पेनड्राईव्ह याची कोणी मागणी केली असेल तर अपील कालावधीनंतर कागदपत्रांची पडताळणी करुन मुळ मालकाला परत करण्यात यावा, अन्यथा अपील कालावधीनंतर त्याचा लिलाव करुन येणारी रक्कम सरकारी खात्यात जमा करण्यात यावी.

५. सदर खटल्यातील जप्त मुद्देमाल एक लोखंडी रॉड व एक लाकडी बांबुची काठी (सविस्तर वर्णन दोषारोपपत्रप्रमाणे) यांचे अपील कालावधीनंतर लिलाव करुन येणारी रक्कम सरकारी खात्यात जमा करण्यात यावी.

६. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ अन्वये प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/– चे जामीन बंधपत्र सादर करावेत. सदर जामीन बंधपत्र सहा महिन्यापर्यंत अस्तित्वात राहतील..

(न्यायनिर्णय खूल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2026.03.16 17:34:09 +0530

**पेठ–वडगांव.** **( जे.एन. भस्मे )**

**दिनांक १६/०३/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, पेठ–वडगांव**